# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक १६/०८/२०१६

## सकाळी ११.३० वा.

| अ. क्र. | विषयाचे नाव | मा. स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | मागील मा. स्थायी समिती सभा दि. ०८/०८/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | **ठराव :-** मागील मा. स्थायी समिती सभा दि. ०८/०८/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणें आले.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वृंदेश पाटील सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी** |
| २ | दहीहंडी उत्सवात गोविंदा पथकाचा विमा काढणेसाठी ओरियंटल इंशुरंस कंपनी लिमिटेड यांचे दरपत्रकास मंजुरी देवून याकामी होणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर विषयाबाबत आजच्या मा.स्थायी समितीच्या सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व गोविंदा पथकांचा अपघाती विमा काढण्यासाठी येणाऱ्या ३ लक्ष ५० हजार इतक्या खर्चास सर्वानुमते वित्तीय मंजूरी देत आहे. या योजनेचा लाभ घेणेसाठी सदर कामी वृत्तपत्रात जाहीर आवाहन प्रसिध्द करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास व याकरीता मे.ओरियंटल इंशुरंस कंपनी लिमिटेड, मुंबई कंपनीला सर्व गोविंदा पथकांचा विमा उतरविण्यासाठी रक्कम रुपये १,५०,०००/- इतकी रक्कम आगाऊ स्वरुपात व उर्वरीत रक्कम सदरचे काम पुर्ण झाल्यानंतर अदा करण्यास सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.वृंदेश पाटील सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले** |
| ३ | वसई-विरार शहर महानगरपालिकेतील कार्यालयात बी.एस.एन.एल ची १० mbps जलदगतीने इंटरनेट (High Speed Internet lease Line) व ४ mbps ची इंटरनेट सुविधा सुरू करणेबाबत. | **ठराव** :- वरील विषयावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार प्रस्तावात नमुद कामासाठी केंद्रशासन अधिकृत भारत दूरसंचार निगम लि. (BSNL) ह्या कंपनीशी संविदा करणेंस त्यांच्याशी कामाचा करारनामा करणेंस, कामाचा कार्यादेश देणेंस व झालेल्या कामाची देयके अदा करणेस आजची सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. सुनील आचोळकर** |
| ४ | सुर्या पाणी पुरवठा योजना मासवण येथील सुर्या नदीपात्रातील उदंनचन विहिरीत पुरामुळे वाहून आलेला कचरा तातडीने पानबुड्यांच्या सहायाने काढून घेणे कामी प्रशासकीय आर्थिक व मान्यता तसेच कामासाठी संविदा | **ठराव :-** सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली व असे ठरविण्यांत आले की, सुर्या योजनेचा पाणी पुरवठा अखंड सुरळीत ठेवण्यासाठी सुर्या नदीपात्रातील उदंनचन विहीरीत पुरामुळे वाहून आलेला कचरा तातडीने पानबुड्याच्या सहाय्याने काढून घेणे आवश्यक असल्याने सदर कामी मे. ग्लोबल डायवींग मरीन सर्व्हीसेस, नालासोपारा यांनी सदर केलेला एक शिफ्टचा दर रु. २५,०००/- व येण्याजाण्याचा दर रु. ३०००/- असा एकूण रु. २८,०००/- प्रति शिफ्टचा दर मंजूर करण्यांत येत असून त्यांच्या सोबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची-ड, प्रकरण -५ संविदा २ (२) नुसार संविदा करण्यास कार्यादेश देण्यास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर कामी ३० शिफ्टनुसार येणाऱ्या एकूण रु. ८,४०,०००/- |

| | | |
|---|---|---|
| | करण्यास मान्यता देणेबाबत. | खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.किशोर पाटील सूचक :- मा.श्री. किशोर पाटील** |
| ५ | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा योजनाअंतर्गत जलशुद्धीकरण केंद्र व उपागांच्या ठिकाणी पाणी शुद्धीकरणासाठी ॲलम पुरवठा करणेकामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम निविदेस मंजुरी देण्यास व कामाची संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व मे. ठक्कर इंनोग्रेनिस प्रा.लि.यांची वाटाघाटी नंतर प्राप्त अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ८.५४% कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यांत येत असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार कामाची संविदा करण्यांस मान्यता देणेत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले** |
| ६ | सन २०१६-१७ ह्या वित्तीय वार्षिक वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रांमध्ये प्रभाग समिती A, B, C, D, E, F, G, H, I मधील विविध विकास कामे करण्यासाठी तांत्रिक सल्लागारांची नियुक्ती करणेकामी कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. (बी - २ निविदा) | **ठराव :-** सदर कामी मे.प्रकाश इंजिनिअरींग कन्ट्रक्शन यांनी दरपत्रकात दर नमुद केले नाहीत. त्यामुळे ते अपात्र ठरले आहेत व त्यांची निविदा रद्द करुन त्याची इसारा रक्कम जप्त करुन घेणे आवश्यक आहे. तसेच उर्वरीत (अ.क्र. १ च्या बाबीकरीता) निविदाधारकांपैकी मे.अंजिक्यतारा कन्सल्टंट ह्यांच्या निविदेमधील दर (वाटाघाटीने) सर्वात कमी व वाजवी आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त ह्यांनी मंजूरी दिली आहे. तसेच सदर दराने अन्य निविदाधारक काम करणेंत इच्छुक असल्यास पॅनल नेमून त्यांचीही पॅनेलवर नेमणूक करणेंत यावी तसेच अन्य कोणीही इच्छुक तांत्रिक सल्लागार तद्नंतर काम करणेस तयार असल्यास त्यानाही सदर कामी पॅनलवर समाविष्ट करण्यांत यावे. याकामी म.न.पा.तर्फे कायदेशीर बाबींची पुर्तता करुन संविदा करणेसाठी ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. समीर डबर** |
| ७ | सन २०१६-१७ या वित्तीय वार्षिक वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या विविध विभागातील विविध उद्याने, स्मशानभूम्या व इतर ठिकाणी बसण्याकरीता बेंचेस पट्टया व संबंधित इतर आवश्यक साहित्य बसविणे कामी कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा करणेस | **ठराव :-** उपरोक्त निविदांची तुलना करता मे.गायत्री इंजिनिअर्स ह्यांची निविदा (वाटाघाटीने) सर्वात कमी व वाजवी आहे. सदर निविदेमधील कास्ट आयर्न बेंचेसचा प्रकार मधील अ.क्र. १ व २ या बाबींचे दर जास्त असल्याने अमान्य करणेंत आलेले आहेत व अ.क्र. ३ या बाबीचे दर कमी व वाजवी असल्याने मा.आयुक्तांनी मंजूर केले असून बेंचेसचे फिटींग्ज प्रकार या मधील अ.क्र. १,२,३ चे तिनही दर मा.आयुक्तांनी मंजूर केलेले आहेत. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेसाठी मा.स्थायी समितीवर मान्यतेसाठी ठेवणेंस मा.आयुक्त ह्यांनी मंजूरी दिली आहे. म.नृ.पा.तर्फे कायदेशीर बाबींचे पुर्तता करुन निविदा दरास व संविदा करणेसाठी ही सभा अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. असे ही सभा ठरविते आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अफिफ शेख सूचक :- मा.श्री. सुनील आचोळकर** |

<table>
<tr><td></td><td>मान्यता देणेबाबत. (बी-२ निविदा)</td><td></td></tr>
<tr><td>८</td><td>वसई-विरार शहर महानगरपालिका मालकीच्या स्मशानभुमीसाठी लागणाऱ्या जळावू लाकडाच्या खरेदी केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.</td><td>ठराव :- उपरोक्त अहवालावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. स्मशानभुमीसाठी लागणारी ३६६१ घनमीटर जळावू लाकडे खरेदी करण्यांत आली असून त्यांची रक्कम रु. ५०,००,०००/- परवाना पास फी रु. १००/- प्रमाणे रक्कम रु.२२,९००/- असे एकूण रक्कम रु. ५०,२२,९००/- फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड यांना करण्यांत आली आहे. त्याकामी झालेल्या आगाऊ खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री.राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील</td></tr>
<tr><td>९</td><td>वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या ९ प्रभाग कार्यक्षेत्रात कृत्रिम तलाव बांधणेची ठिकाणे निश्चित करून अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.</td><td>ठराव :-वरील प्रमाणे कार्यालयीन प्रस्तावाचे अवलोकन केले असता सदर कामी होणाऱ्या प्रत्येकी अंदाजपत्रकीय रक्कम रु.१८,८५,४७०/- या प्रमाणे होणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे. व सदर कामी खाली नमुद यादीनुसार ई- निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>प्रभाग समिती</th><th>कृत्रिम तलावाचे ठिकाणे</th><th>ठिकाणांची संख्या</th><th>अंदाजित रक्कम</th></tr>
<tr><td>१</td><td>अे</td><td>१) म्हाडा मैदान, विरार (प.)<br>२) सर्व्हे क्र.४०१ गोकुळ टाऊनशिप विरार (प.)<br>३) सर्व्हे क्र. ३८८, बोळींज डी.टी हॉटेलच्या बाजूला</td><td>३</td><td>रु.५६५६४१०/-</td></tr>
<tr><td>२</td><td>ब</td><td>१) नालासोपारा विरार ९० फुट लिंक रोड<br>२) संत नगर, तोंडारे हॉस्पिटल समोर रस्त्यालगत</td><td>२</td><td>रु.३७७०९४०/-</td></tr>
<tr><td>३</td><td>क</td><td>१) कोपरी तलाव<br>२) सेंटर पिटर हायस्कूल जवळ</td><td>२</td><td>रु.३७७०९४०/-</td></tr>
<tr><td>४</td><td>ड</td><td>१) शेठ विद्यामंदिर मागे, अग्रवाल नगर<br>२) हवळु नगर, रेल्वे जवळ, नालासोपारा (पू.)</td><td>२</td><td>रु.३७७०९४०/-</td></tr>
<tr><td>५</td><td>ई</td><td>१) श्रीप्रस्थ ४ था रस्त्याच्या बाजूस नालासोपारा (प.) २) चक्रेश्वर मंदिर ट्रस्ट यांची जागा, नाळा रोड</td><td>२</td><td>रु.३७७०९४०/-</td></tr>
</table></td></tr>
</table>

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | एफ | १) पेल्हार कार्यालयाजवळ<br>२) धानिव तलावाजवळ<br>३) रशिद कम्पाऊंड मध्ये | ३ | रु.५६५६४१०/- |
| ७ | जी | १) गोखिवरे भाटपाडा<br>२) वालीव आप्पा मैदान<br>३) जुचंद्र स्टार सिटी मध्ये | ३ | रु.५६५६४१०/- |
| ८ | एच | १) कौल सिटी, चुळणे | १ | रु.१८८५४७०/- |
| ९ | आय | १)पापडी गार्डन, हुतात्मा स्मारकामागे<br>२) तामतलाव स्विमींग पुल लगत<br>३) सुरुची बाग (रस्त्यालगत) | ३ | रु.५६५६४१०/- |

अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील    सूचक :- मा.श्री. समिर डबरे